(९८३)

2015042212280363327

अंबई साठवण तलावास
(ता. त्र्यंबक, जि. नाशिक)
प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र. लपायो- २००५/३०४/(३२२/२००५)/खारभूमि
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २६/०७/२००५

पहावे- १) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई. यांचे पत्र क्र. ३८०५/सा.त./अंबई/ना-१/६९८, दिनांक २८/२/२००५
२) अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. ठापामं/प्रशा-६/३८३१/२००५, दिनांक ३०/५/२००५.

प्रस्तावना:-

अंबई साठवण तलाव, (ता. त्र्यंबक, जि. नाशिक) या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

आता या शासन निर्णयान्वये अंबई, साठवण तलाव ता. त्र्यंबक, जि. नाशिक या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रु. ४,५३,१७,०५५/- (चार कोटी, त्रेपन्न लक्ष, सतरा हजार, पंचावन्न फक्त) यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापैकी रु. ३,६७,१२,८९२/- कामाप्रीत्यर्थ व रु. ८३,०४,३६३ अनुषंगी खर्च आहे. अंदाजपत्रकात कामासाठी सन २००३-२००४ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उप शिर्षवार तरतूदीचा गोषवारा सोबत परिशिष्टामध्ये जोडला आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्रमांक आय-३ "४७०२" लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च (१) सर्वसाधारण लघु पाटबंधारे योजना (एक) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्यानंतरच या योजनेवर खर्च करण्यात यावा.

हा शासन निर्णय आंतरवित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता '०७/२००५' अनुक्रमांकाने नोंदविण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्री. द. देशपांडे
(श्री. द. देशपांडे)
शासनाचे अवर सचिव

प्रतिलिपी :-

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई.
आंतर वित्त सल्लागार व उप सचिव जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, कळवा, ठाणे
अवर सचिव, (खारभूमि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
उप अभियंता (श्री. [illegible]) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
अर्थशाखा - १, २ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
[illegible]-१ कार्यासन (५ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
जिल्हाधिकारी नाशिक
विभागीय संपर्क अधिकारी माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
खारभूमि कार्यासन (संग्रहार्थ)

(दिनांक १६/०७/२००५ चा शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र. लपायो २००५/ ३०४/(१२२/२००५)/खारभूमि चे सहपत्र)

विवरणपत्र

अचर्ड साठवण तलाव, ता. त्र्यंबक, जि. नाशिक

अंदाजाचा गोषवारा

अ.क्र.	उपशीर्ष	कामाची किंमत (रुपये)	
		शीर्ष कामे	एकूण
१.	ए-प्राथमिक	५०,०००	५०,०००
२.	बी-भूसंपादन	२९,७१,०७५	२९,७१,०७५
३.	सी-कामे	३,१९,३२,११०	३,१९,३२,११०
४	ओ- संकीर्ण	-	-
५.	पी- देखभाल	१०,८३,९०७	१०,८३,९०७
६.	आर-दळणवळण	६,७५,०००	६,७५,०००
	एकूण कामाप्रीत्यर्थ	**३,६७,१२,८९२**	**३,६७,१२,८९२**
	अधिक आनुषंगिक खर्च २५.५० टक्के (भूसंपादन राजशुल्क आकारणी वगळून)	-	**८६,०४,१६३**
	योजनेची एकूण किंमत	-	**४,५३,१७,०५५**

ठळक बाबी :

(१)	सिंचन क्षमता	२६० हेक्टर
(२)	एकूण पाणीसाठा (सघमी)	११७७.५०
(३)	पाणीसाठ्याची किंमत रु.	२०८१२ < २०८३४ .. ठीक आहे
(४)	लाभव्यय प्रमाण	१.४३ > १.०० .. ठीक आहे